मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशी कचरा डेपो दुर्घटना : पर्यावरण विभाग आणि ठेकेदार कंपनीला नोटीस देण्याचे निर्देश

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देश; पर्यावरण विभाग व अँटोनी लारा रिन्युएबल कंपनीविरुद्ध नोटीस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी आज मोशी कचरा डेपो दुर्घटनेसंदर्भात महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी मोशी कचरा डेपो दुर्घटनेसंदर्भात महापालिकेचा पर्यावरण विभाग तसेच अँटोनी लारा रिन्युएबल या संबंधित ठेकेदार कंपनीला नोटीस देण्याचे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत.

बैठकीला अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास कचऱ्याचा ढीग 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळून गंभीर दुर्घटना घडली. या इमारतीत २२ तर इमारतीशेजारी असलेल्या कचऱ्याच्या ढिगाखाली १ असे एकूण २३ नागरिक अडकले होते. या पैकी इमारतीतून पाच नागरिक सुखरुप बाहेर पडले. उर्वरित अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी भारतीय सेना, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पीएमआरडीए अग्निशमन दल, पोलीस प्रशासन यांनी बचावकार्य सुरू केले. यामध्ये इमारतीत अडकलेल्या ९ नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्यात बचावपथकाला यश आले. तर या घटनेत इमारतीत अडकलेल्या ९ नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी या घटनेच्या सखोल चौकशी आदेश दिले आहेत. या संदर्भात आयुक्त डॉ.सूर्यवंशी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेत तात्काळ महापालिकेचा पर्यावरण विभाग व संबंधित ठेकेदार कंपनी यांना नोटीस देण्याचे निर्देश दिले आहेत.

# मोशी दुर्घटनेतील बचाव कार्य अखेर 4 दिवसांनंतर संपले; मृतांची संख्या 9 वर

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कचरा डेपोत घडलेल्या भीषण दुर्घटनेतील शोधमोहीम अखेर संपली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मोशी येथील पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कचरा डेपोत घडलेल्या भीषण दुर्घटनेतील शोधमोहीम अखेर रविवारी मध्यरात्री १ वाजता संपली आहे. बुधवारपासून सुरू असलेल्या या युद्धपातळीवरील बचावकार्यात शनिवारी चौथ्या दिवशी इमारतीमधून ७ जणांचे, तर मध्यरात्री कचऱ्याच्या ढिगाऱ्याखालून एकाचा मृतदेह हाती आला. यापूर्वी गुरुवारी एकाचा मृतदेह बाहेर काढला होता. त्यामुळे या अत्यंत दुर्दैवी दुर्घटनेतील एकूण मृतांची संख्या आता ९ झाली आहे.



८ जुलै (बुधवार) रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास मोशी कचरा डेपोमधील कचऱ्याचा प्रचंड मोठा ढीग 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळला. या दुर्घटनेत इमारतीमध्ये २२ आणि इमारतीशेजारी कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली १ असे एकूण २३ नागरिक अडकले होते. त्यापैकी ५ नागरिक सुरुवातीलाच सुखरुप बाहेर पडले. उर्वरित नागरिकांना वाचवण्यासाठी भारतीय सेना, एनडीआरएफ (NDRF), पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे तात्काळ बचावकार्य सुरू केले. पहिल्याच दिवशी इमारतीतील ९ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात यश आले होते.

दुर्घटनाग्रस्त इमारत अत्यंत धोकादायक आणि अस्थिर झाल्यामुळे आत प्रवेश करण्यासाठी बचाव पथकासमोर मोठे आव्हान होते. सुरक्षित मार्ग तयार करण्यासाठी १२ पोकलेन, डंपर आणि जेसीबी मशीनच्या सहाय्याने मलबा हटवण्याचे काम सुरू करण्यात आले. शुक्रवारी रात्री इमारतीचा धोकादायक काँक्रिट भाग नियंत्रित पद्धतीने पाडण्यासाठी दोन अत्याधुनिक 'डिमोलीशन एक्सकॅव्हेटर मशिन' मागवण्यात आल्या आणि एनडीआरएफच्या मार्गदर्शनाखाली इमारतीचा अस्थिर भाग हटवून आत प्रवेश करण्यात आला.

### रुग्णालयाकडून ९ जणांना मृत घोषित

- » भावेश वाणी: (यांचा मृतदेह गुरुवारी, ९ जुलै रोजी इमारतीतून बाहेर काढण्यात आला होता.)
- » अक्षय सावंत (वय ३५, रा. मोशी)
- » सुनील कोरके (वय ४०, रा. आळंदी)
- » सन्नी माने (वय ३९, रा. गंधर्वनगरी, मोशी)
- » महेश कुंभार (वय ३३, रा. छत्रपती संभाजीनगर)
- » नागेश गायकवाड (वय २६, रा. संजय गांधी नगर, मोशी)
- » रणजीत पाटील (वय २२, रा. मोशी)
- » राहुल गायकवाड (वय ३५, रा. मोशी)
- » वामन कसबे: इमारतीशेजारील कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या वामन कसबे यांचा शोध घेण्यासाठी एनडीआरएफच्या श्वान पथकाची (Dog Squad) मदत घेण्यात आली.

बचाव पथकाने शोधून काढलेल्या या सर्वांना तातडीने पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात पाठवण्यात आले होते. मात्र, पालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे आणि डॉक्टरांनी तपासणीअंती या सर्वांना मृत घोषित केले. बुधवार दुपारी अडीच वाजल्यापासून सुरू झालेले हे थरारक आणि आव्हानात्मक शोधकार्य तब्बल ८० तासांनंतर रविवारी मध्यरात्री संपले असून, या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आकुर्डीतील वारकरी भवन 20 वर्षांपासून कागदावरच

## 2006 मध्ये ठराव, निधी मंजूर होऊनही काम रखडले; खंडोबा माळ येथील 22 गुंठे जागेत भवन उभारण्याची वारकऱ्यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आषाढी वारी पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात मुक्कामी राहून गुरुवारी (दि.९) पुणे शहराकडे मार्गस्थ झाला. मात्र, या परिसरातील पालखी तळाची जागा अपुरी पडते. त्यामुळे सोहळा प्रमुखांसह विश्वस्त व अन्य प्रमुख दिंड्यांतील वारकऱ्यांच्या मुक्कामाची गैरसोय होते. ती दूर करण्यासाठी आकुर्डी येथील खंडोबा माळ येथील 22 गुंठे जागेत वारकरी भवन उभारावे, अशी मागणी गेल्या दोन दशकांपासून केली जात आहे. महापालिकेने वारकरी भवन उभारणीसाठी सन 2006 मध्ये ठराव केला होता. अद्याप वारकरी भवन कागदावरच आहे.

संत तुकाराम महाराज यांचे देहू आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे संजीवन समाधी स्थळ आळंदी ही तीर्थक्षेत्रे आकुर्डीपासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर आहेत. वर्षभर विविध कार्यक्रमांनिमित्त वारकऱ्यांची आकुर्डीतून ये-जासुद्धा सुरू असते. आषाढी वारीनिमित्त देहू येथून पंढरपूरकडे निघालेला संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा देहूनंतरचा पहिला मुक्काम पिंपरी-चिंचवड शहरातील आकुर्डीत असतो.



### महापालिकेने वारकरी भवन लवकरात लवकर उभारावे

**» जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा देहूनंतरचा पहिला मुक्काम आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरात असतो. वाढते शहरीकरण व नागरीकरणामुळे पालखी सोहळ्यातील दिंड्या, वारकरी, फडकरी यांना निवासाची समस्या भेडसावत आहे. वारकरी भवन उभारल्यास वारकऱ्यांच्या निवासाची व्यवस्था होईल. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रशस्त व सुंदर वारकरी भवन उभारून वारकऱ्यांना आगळीवेगळी भेट द्यावी, असे देहूच्या श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी सांगितले.**

येथील पालखी तळाची जागा अपुरी पडत असल्याने वारकऱ्यांची मोठी गैरसोय होते. वारकऱ्यांना हक्काचे निवारा केंद्र मिळावे, म्हणून वारकरी संप्रदायाकडून सातत्याने वारकरी भवन उभारण्याची मागणी होत आहे. मात्र, वारकऱ्यांच्या मागणीला अद्याप यश आले नसून, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन फक्त कागदी घोडे नाचवत आहे. दरवर्षी आषाढी वारीच्या वेळी वारकऱ्यांच्या मुक्कामाचा प्रश्न ऐरणीवर येतो. वारकरी भवन उभारण्याबाबत कार्यवाही होत नसल्याचे वारकऱ्यांमध्ये महापालिकेच्या कारभाराविषयी चीड निर्माण झाली आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने आकुर्डीत वारकरी भवन उभारण्याबाबत डिसेंबर 2006 मध्ये ठराव मंजूर केला होता. त्यासाठीची जागाही निश्चित करून 66 लाख 98 हजार रुपयांचा निधीही मंजूर केला. मागील 20 वर्षात काहीच झाले नाही. सन 2024 मध्ये तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित जागेची पाहणी करून वारकरी भवन उभारले जाईल, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर त्यांनी 2024-25 च्या महापालिकेच्या अर्थसंकल्पात वारकरी भवन उभारण्याच्या कामाचा समावेश केला होता. मात्र, त्यानंतर पुन्हा वारकरी भवन उभारण्याबाबत पुढेच काहीच झाले नाही. त्यामुळे वारकरी भवन तातडीने उभारावे, अशी मागणी वारकऱ्यांमधून सातत्याने केली जात आहे. यंदाच्या वारीतही त्याचा मुहूर्त लागलेला नाही.

### आर्किटेक्टची नियुक्ती

**» आकुर्डी येथील खंडोबा माळ येथील 22 गुंठे जागेत वारकरी भवन उभारण्याचे नियोजन आहे. यासाठी आर्किटेक्ट नियुक्त करण्यात आला आहे. भवनच्या बांधकामासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.**

# पवना धरणात 70 टक्के पाणीसाठा, पिंपरी-चिंचवडकरांची पाण्याची चिंता मिटली...

## धरणक्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीत कमालीची वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळातील पवना धरण क्षेत्रात मागील चार ते पाच दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहराला प्रामुख्याने पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठा आता ७४ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरण क्षेत्रात झालेल्या या दमदार पावसामुळे शहरवासीयांची पिण्याच्या पाण्याची चिंता तूर्तास मिटली आहे.

यापार्श्वभूमीवर, महापालिकेने जून महिन्यात लागू केलेली १५ टक्के पाणी कपात आता त्वरित रद्द करावी, अशी आग्रही मागणी शहरातील नागरिकांमधून आणि विविध सामाजिक संघटनांमधून होऊ लागली आहे. यंदाच्या वर्षी मान्सून लांबल्यामुळे जून महिन्याच्या मध्यात पवना धरणातील पाणीसाठा अवघा १६ टक्क्यांपर्यंत खाली घसरला होता. त्यामुळे जलसंपदा विभाग आणि महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून १९ जूनपासून संपूर्ण शहरात १५ टक्के पाणी कपात लागू केली होती. यामुळे शहरातील अनेक भागांत एक ते दीड तासाने पाण्याचा वेळ कमी करण्यात आला होता, ज्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता.



### पाणी कपात मागे घेण्याची नागरिकांची मागणी

**» पवना धरणातील पाणी साठ्याची स्थिती समाधानकारक झाल्याचे समजताच शहरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, त्याच वेळी पाणी कपातीमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी आता प्रशासनाने ही कपात मागे घ्यावी, अशी मागणी आहे. शहरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी कपातीमुळे दररोज पाण्याचे टँकर्स मागवावे लागत आहेत, ज्यामुळे रहिवाशांवर आर्थिक भुर्दंड पडत आहे. लोकप्रतिनिधी आणि विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनीही या मागणीला पाठिंबा दिला असून, महापालिका आयुक्तांनी याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन केले आहे.**

### महापालिका प्रशासनाची भूमिका

**» नागरिकांच्या वाढत्या मागणीनंतर आता सर्वांचे लक्ष पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जलसंपदा विभागाच्या निर्णयाकडे लागले आहे. प्रशासन सध्या धरण क्षेत्रातील पावसाच्या पुढील अंदाजावर आणि येत्या काही दिवसांतील पाणी साठ्याच्या स्थिरतेवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. धरणातील साठा ७५ ते ८० टक्क्यांच्या पुढे गेल्यास किंवा पावसाचा हाच जोर कायम राहिल्यास, येत्या दोन ते तीन दिवसांत १५ टक्के पाणी कपात अधिकृतपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्याची स्थिती पाहता शहरावरील पाण्याचे संकट टळले असले, तरी प्रशासनाकडून कपात रद्द होण्याची अधिकृत घोषणा कधी होते, याकडे संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांचे डोळे लागले आहेत.**

# तूर्त पाणीकपात नाही, पुढील आठवड्यात निर्णय

## सध्या समाधानकारक पाणीसाठा असल्याने पुणेकरांना आणखी काही दिवस नियमित पाणीपुरवठा सुरू राहणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत सध्या समाधानकारक पाणीसाठा असल्याने पुणेकरांना आणखी काही दिवस नियमित पाणीपुरवठा सुरू राहणार आहे.

दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय पुढील आठवड्यातील सर्वपक्षीय बैठकीत होणार आहे. तोपर्यंत पुणेकरांना दररोज नियमित पाणी दिले जाणार असल्याचे पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने शनिवारी स्पष्ट केले.

पालखी सोहळ्यानिमित्त पालिकेने ७ ते १२ जुलैदरम्यान पाणीकपात स्थगित केली होती. ही मुदत रविवारी (१२ जुलै) संपत आहे. सोमवार पासून पुन्हा पाणीकपात होणार का याबाबत पुणेकरांमध्ये संभ्रम होता. खडकवासला धरण साखळीत सध्या १६.६४ टीएमसी पाणीसाठा आहे.

काही दिवसांपूर्वीच्या मुसळधार पावसामुळे धरणांतील साठ्यात मोठी वाढ झाली आहे. कपातीबाबत पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप म्हणाले की, पाणीकपातीचा निर्णय होईपर्यंत शहरातील नियमित पाणीपुरवठाच कायम राहील. याबाबत सर्व संबंधित अधिकारी व कनिष्ठ अभियंत्यांना जुन्या वेळापत्रकानुसार पाणीकपात लागू करू नये, अशा सूचना दिल्या आहेत.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत सध्या समाधानकारक पाणीसाठा असल्याने पुणेकरांना आणखी काही दिवस नियमित पाणीपुरवठा सुरू राहणार आहे.



### सर्वपक्षीय बैठकीत होणार अंतिम निर्णय

» दिवसाआड पाणीपुरवठा पुन्हा सुरू करायचा की कायमस्वरूपी मागे घ्यायचा, याबाबतचा अंतिम निर्णय पुढील आठवड्यात होणाऱ्या सर्वपक्षीय बैठकीत घेतला जाणार आहे. पालखी सोहळ्यानिमित्त ७ ते १२ जुलैदरम्यान पाणीकपात स्थगित करण्यात आली होती. ही मुदत संपल्यानंतर नागरिकांमध्ये पुन्हा कपात सुरू होणार का, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, बैठकीत निर्णय होईपर्यंत कोणतीही पाणीकपात लागू केली जाणार नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

> धरणांमध्ये सध्या समाधानकारक पाणीसाठा आहे. याबाबत पुढील आठवड्यात सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेऊन आढावा घेतला जाईल. त्याचवेळी पाणीकपातीचा अंतिम निर्णय होईल. तोपर्यंत शहरात नियमित पाणीपुरवठा सुरू राहील
>
> \- मंजूषा नागपुरे, महापौर.

### धरणसाठा वाढल्याने दिलासा

» खडकवासला धरण साखळीत सध्या १६.६४ टीएमसी इतका समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध असल्याने पुणेकरांना नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचा निर्णय महापालिकेने कायम ठेवला आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा वाढला आहे. त्यामुळे शहरातील पाणीटंचाईची स्थिती सध्या नियंत्रणात आली आहे. पाणीपुरवठा विभागाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पूर्वीप्रमाणे नियमित वेळापत्रकानुसार पाणी देण्याच्या सूचना दिल्या आहेत. पुढील काही दिवस पावसाचा अंदाज अनुकूल असल्याने नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

### अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना

» महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी सर्व संबंधित अधिकारी आणि कनिष्ठ अभियंत्यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, नवीन निर्णय होईपर्यंत जुन्या दिवसाआड पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक लागू करू नये. शहरातील सर्व भागांना नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा सुरू ठेवावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

# आरोग्य सेवेचा लाभ 53 हजार वारकऱ्यांना

## पालखी मार्ग, मुक्काम स्थळे आणि आरोग्य केंद्रांवर मोफत औषधोपचार, फिजिओथेरपी आणि वैद्यकीय सुविधा देण्यात आल्या

**पुणे | प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने उभारलेल्या विशेष आरोग्य व्यवस्थेचा तीन दिवसांत ५३ हजार ८९३ वारकऱ्यांनी लाभ घेतला. पालखी मार्ग, मुक्काम स्थळे आणि महापालिकेच्या आरोग्य केंद्रांवर आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार, फिजिओथेरपी आणि विविध वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

वारीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची प्रसूतिगृहे, दवाखाने, आयुष्मान आरोग्य मंदिरे आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे वारकऱ्यांसाठी मोफत केस पेपर व औषधांची व्यवस्था करण्यात आली होती. पालखी मार्गावरील महत्त्वाच्या ठिकाणी, तसेच स्वागत कक्षांमध्ये विशेष आरोग्य बूथ उभारून वारकऱ्यांच्या आरोग्यावर सातत्याने लक्ष ठेवण्यात आले.

वारकऱ्यांचे वजन, उंची आणि रक्तदाबाची नोंद घेण्यात आली. तसेच रक्त, थुंकी (क्षयरोग), मलेरिया आणि मधुमेह तपासणीसह विविध चाचण्या करण्यात आल्या. उपचारांची गरज असलेल्या २१ वारकऱ्यांना रुग्णवाहिकेद्वारे कमला नेहरू रुग्णालयात पुढील उपचारांसाठी दाखल करण्यात आले.या काळात १ हजार २२४ वारकऱ्यांनी फिजिओथेरपी सेवेचा लाभ घेतला

पालखी मुक्कामस्थळी २५० प्रथमोपचार मेडिकल किटचे वितरण करण्यात आले, तर महिला वारकऱ्यांना १० हजार सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. पालखी मार्गावरील ३५ ठिकाणी वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली होती. भवानी पेठ आणि नाना पेठ येथील मुक्कामस्थळी २४ तास वैद्यकीय सेवा उपलब्ध होती.



> पुणे ते पंढरपूर या संपूर्ण प्रवासादरम्यान महापालिकेची चार स्वतंत्र वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका वारकऱ्यांसमवेत कार्यरत राहणार आहेत. या पथकात वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचाऱ्यांचा समावेश असणार आहे.
>
> \- डॉ. नीना बोराडे आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका

# 23 गावांच्या हस्तांतरणाचा मार्ग मोकळा

## पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या 23 गावांच्या प्रशासकीय हस्तांतरण प्रक्रियेला आता वेग आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांच्या प्रशासकीय हस्तांतरण प्रक्रियेला आता वेग आला आहे.

संबंधित कागदपत्रांचे स्कॅनिंग आणि डिजिटायझेशनचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम पूर्ण होताच या गावांशी संबंधित सर्व अभिलेख, मंजूर विकास आराखडे, जमीनविषयक नोंदी, टाउन प्लॅनिंग (टीपी) योजनांची कागदपत्रे, तसेच विविध विकासकामांचा तपशील अधिकृतपणे पुणे महापालिकेकडे वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे या गावांतील विकासकामांची जबाबदारी पूर्णपणे महापालिकेकडे येणार असून, नागरिकांना आवश्यक प्रशासकीय सेवा एकाच यंत्रणेमार्फत उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या २३ गावांमधील टाउन प्लॅनिंग (टीपी) योजना, रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा, आरक्षणांची अंमलबजावणी, विकास परवानग्या, तसेच इतर नागरी विकासाशी संबंधित सर्व कामे पुणे महापालिकेला हाताळावी लागणार आहेत. यामुळे संबंधित विभागांमध्ये आवश्यक समन्वय साधून प्रलंबित कामांना गती देण्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर उभे राहणार आहे.

या गावांचा महापालिकेत समावेश झाल्यानंतर नागरिकांकडून मूलभूत सुविधांबाबत मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. रस्ते, पाणी, ड्रेनेज, घनकचरा व्यवस्थापन, उद्याने, आरोग्य सुविधा आणि शैक्षणिक, पायाभूत सुविधा यांसारख्या सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी महापालिकेला नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे लागणार आहे.

त्याचबरोबर पीएमआरडीएकडून सुरू असलेल्या विकास प्रकल्पांची सातत्याने अंमलबजावणी, टीपी योजनांमधील प्रलंबित बाबींचा निपटारा आणि नव्या विकास प्रस्तावांना गती देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची गरजही व्यक्त केली जात आहे.

कागदपत्रांचे स्कॅनिंग पूर्ण झाल्यानंतर प्रशासकीय हस्तांतरणाची प्रक्रिया औपचारिकरीत्या पूर्ण होईल आणि त्यानंतर या सर्व गावांच्या विकासाची धुरा पुणे महापालिकेकडे अधिकृतपणे सोपविली जाणार आहे.



### महापालिकेसमोर विकासाचे मोठे आव्हान

» हस्तांतरणानंतर २३ गावांतील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा, सार्वजनिक सुविधा, आरक्षणे, विकास परवानग्या आणि टाऊन प्लॅनिंग योजनांची जबाबदारी पुणे महापालिकेवर येणार आहे. अनेक प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्याबरोबरच नव्या विकास आराखड्यांची अंमलबजावणी करावी लागणार आहे. संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा देण्यासाठी महापालिकेला नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे लागणार आहे.

### २३ गावांचे हस्तांतरण अंतिम टप्प्यात

» पीएमआरडीए हद्दीतील पुणे महापालिकेत समाविष्ट २३ गावांच्या प्रशासकीय हस्तांतरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. कागदपत्रांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन पूर्ण झाल्यानंतर सर्व अभिलेख, विकास आराखडे, टीपी योजना, जमीन नोंदी आणि विकासकामांची माहिती अधिकृतपणे महापालिकेकडे वर्ग केली जाणार आहे. त्यामुळे या गावांतील विकासकामांची जबाबदारी पूर्णपणे महापालिकेकडे येईल. नागरिकांना एकाच यंत्रणेमार्फत प्रशासकीय सेवा उपलब्ध होणार असून विकास प्रक्रियेला अधिक गती मिळण्याची अपेक्षा आहे.

### नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या

» महापालिकेत समावेशानंतर २३ गावांतील नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत. चांगले रस्ते, नियमित पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य सेवा, उद्याने, शैक्षणिक सुविधा आणि स्वच्छता यासाठी महापालिकेकडे आता थेट जबाबदारी असेल. पीएमआरडीएकडील सुरू असलेल्या विकासकामांमध्ये सातत्य राखणे, टीपी योजनांतील प्रलंबित बाबी निकाली काढणे आणि नव्या प्रस्तावांना गती देण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा उभारण्याचीही गरज व्यक्त होत आहे.

# पुण्याच्या वाहतूक कोंडीवर उपायासाठी एचसीएमटीआरला पुन्हा गती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महापालिकेची हालचाल; स्वतंत्र एचसीएमटीआर कक्ष कार्यान्वित होणार,करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून महापालिकेच्या १९८७च्या विकास आराखड्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रूट (एचसीएमटीआर) या अंतर्गत वर्तुळाकार मार्गाच्या प्रकल्पाला पुन्हा एकदा गती देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी दोनच दिवसांपूर्वी विशेष समित्यांची स्थापना जाहीर केल्यानंतर महापालिकेनेही या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी स्वतंत्र एचसीएमटीआर कक्ष पुन्हा कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्या नेतृत्वाखाली हा स्वतंत्र कक्ष कार्यरत राहणार असून, त्यामध्ये कार्यकारी अभियंत्यांपासून कनिष्ठ अभियंत्यांपर्यंत विविध स्तरांवरील अधिकारी व अभियंत्यांचा समावेश असेल. या कक्षामार्फत एचसीएमटीआर मार्गावरील विविध सेवा वाहिन्यांचे सर्वेक्षण, भूसंपादनासाठी संबंधित जागामालकांशी समन्वय व संवाद, रस्त्याचा आराखडा तयार करणे तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यापूर्वी २०१९ मध्येही एचसीएमटीआरसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला होता.

मात्र, त्यानंतर कोरोनाच्या संकटामुळे आणि बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे हा महत्त्वाचा प्रकल्प मागे पडला. एवढेच नव्हे, तर गेल्या वर्षी प्रशासनाने एचसीएमटीआरच्या ऐवजी त्याच मार्गावर निओ मेट्रोचा पर्याय पुढे आणल्याने या प्रकल्पावरील चर्चा थंडावली होती. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील वाहतूक प्रश्नावर पुन्हा लक्ष केंद्रित करत भुयारी रस्ते, मेट्रोचे विस्तारीकरण आणि एचसीएमटीआर या तिन्ही पर्यायांचा एकत्रित विचार करण्याचे निर्देश दिले आहेत.



### प्रमुख जोडणी

» एचसीएमटीआर मार्ग बोपोडी, औंध, शिवाजीनगर, एरंडवणे, कोथरूड, कर्वेनगर, दत्तवाडी, पर्वती, बिबवेवाडी, वानवडी, हडपसर, मुंढवा, कल्याणीनगर, येरवडा, कळस, विश्रांतवाडी या भागांना जोडत पुन्हा बोपोडी येथे येऊन मिळणार आहे.

### प्रकल्पाची उद्दिष्टे

» शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे. सार्वजनिक वाहतुकीला अधिक प्राधान्य देणे. मेट्रो आणि बीआरटीसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांशी एकात्मिक जोडणी निर्माण करणे. शहरातून जाणाऱ्या वाहनांसाठी पर्यायी वर्तुळाकार मार्ग उपलब्ध करून देणे.